२३(८
काव्य
२२५९५
संदर्भ



REFBK-0022515
REFBK-0022515

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. 23(8
22595 काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी आपल्या
प्राणांची आहुती दिली त्या
हुतात्म्यांचे चरणी
सादर अर्पण !

B. M. PARADKAR
254-55 'A' Ward,
Ubha - Maruti Chouk,
Shivaji-Peth, Kolhapur.
(MAHARASHTRA STATE)

भा. म. पराडकर.
२५४-५५ 'ए' वॉर्ड
उभा-मारुती चौक,
शिवाजी पेठ, कोल्हापूर.

# ❋ सुर्यकमल ❋



( बालगीत संग्रह )

कवि

**भा. म. पराडकर**

मूल्य ७५ पैसे

प्रकाशनाचे सर्व हक्क प्रकाशकाकडे.
बक्षीस, उतारे, भाषांतर, ध्वनिमुद्रण
इत्यादी हक्क कवीकडे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2358
दा. क्र. 22575 का. १९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

पहिली आवृत्ती-
१५ ऑगस्ट १९७२

पुस्तके मिळण्याचे प्रमुख ठिकाण
शामराव विठ्ठल मेवेकरी
महालक्ष्मी देवालय, पूर्व दरवाजा, कोल्हापूर.
आणि इतर सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्याकडे.

प्रकाशक :- शामराव विठ्ठल मेवेकरी
१८५५ ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

मुद्रक:- पांडूरंग गोविंदराव वरुटे
शारदा प्रिंटींग प्रेस, १३६१ सी,
लक्ष्मीपुरी-कोल्हापूर.

# प्रकाशकाचे दोन शब्द

माझे स्नेही श्री भा. म. पराडकर यानीं रचलेल्या देशभक्ती-पर बालगीतांचा हा संग्रह प्रकाशित करताना, मला मोठा आनंद होत आहे. कारण स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवाचे वेळीच, अशा तऱ्हेचे, मुलांचेवर देशभक्तीचे सुसंस्कार घडविणारे आणि त्यांच्यात स्वदेशा विषयी प्रेम निर्माण करणारे साहित्य प्रकाशित करण्याची संधी मला मिळाली हे होय. विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यांचे पालक या संग्रहाचे चांगलेच स्वागत करतील अशी माझी खात्री आहे.

१५ ऑगस्ट १९७२ —शामराव विठ्ठल मेवेकरी

कोल्हापूर.

# लेखकाचे मनोगत

१५ ऑगस्ट १९४७! पंचवीस वर्षापूर्वी याच दिवशी, आपला हा भारत देश, गुलामगिरीच्या अधःकारातून बाहेर पडला आणि त्याला स्वातंत्र्य-सूर्याचे प्रथमच दर्शन घडले. आपला हा भारत स्वतंत्र्य करण्यासाठी अनेक लहान थोर भारतियाना अतिशय हाल सहन करावे लागले. काहीना तर खडतर तुरुंगवास भोगावा लागला तर काहींना देहत्यागही करावा लागला. या सर्वांच्या प्रयत्नांचे आणि त्यागाचे फळ, म्हणजेच आपल्या देशाला मिळालेले स्वातंत्र्य होय. अशा या थोर देशभक्तांचे कार्य म्हणजेच आजच्या बाल व तरुण पिढीला मिळणारी प्रेरणा होय. मुलानों तुम्हीं स्वतंत्र्य भारतात जन्मलात! खरोखरच तुम्ही भाग्यवान ! तेव्हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्य रक्षणासाठी आणि देश बलवान व समृद्ध करण्यासाठी, आपण सर्व जण या शुभदिनी प्रतिज्ञा करूया या. अशा राष्ट्रीय उत्सवाचे वेळी सर्वांनी मिळून म्हणण्यासाठी, देशप्रेम जागृत करणाऱ्या बालगीतांचा छोटासा संग्रह प्रसिद्ध होत असताना मला मोठा आनंद होत आहे.

१५ ऑगस्ट १९७२ —कवि

कोल्हापूर. भा. म. पराडकर

# पुरस्कार

'सूर्यकमल' या छोटयाशा संग्रहातील श्री. भा. म. पराडकर यांची गीते, राष्ट्रीय भावनेला आवाहन करणारी आहेत. या गीतात स्वातंत्र्य चळवळीचे सूत्रधार महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, पंथप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी इत्यादी नेत्यांचा केलेला गौरव यथोचित असून युवक युवतीनां स्फूर्ती देणारा आहे. राष्ट्रभक्तीने प्रेरित होउन कवी म्हणतो–

'आता एकच, घेऊ आण
रक्षू भारत देउनी प्राण !

या शब्दांतील आवेश लक्षणीय आहे. देशरक्षणासाठी सज्ज असणाऱ्या समरधुरंधर भारतीय सैनिकांचा पराक्रम कवी समरसतेने गातो. समतेसाठी व मानवतेंसाठी कंकण बांधणारा हा कवी, 'सहकाराच्या' व 'जय–जगत्' च्या नव्या मंत्रघोषानेच अखिल जगाचा उद्धार होईल अशी श्रद्धा बाळगतो आणि प्रतिज्ञा करतो की–

'समाजवादी लोकशाहिची
गुढी उभारू उंच नभी !

देशप्रेमाची आवेशपूर्ण भावना, शब्दकळेतले साधेच पण सहज सौंदर्य, नादमाधुर्य, गेयता इत्यादी गुणांनी नटलेल्या या गीतांचे रसिकांकडून चांगले स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

१५ ऑगस्ट १९७२ —सूर्यकांत खांडेकर
कोल्हापूर.

# स्तुत्य उपक्रम

कोटिकोटी सूर्यांचे तेज पिऊन जन्मलेल्या जातिवंत देशभक्तांनी मातेला मुक्त केले. परतंत्र भारत स्वतंत्र झाला. गणतंत्र झाला. प्राप्ती किंवा निर्मितीपेक्षा जोपासना मोलाची! तथाकथित राज्यधुरीणांच्या असमर्थतेला जनजागृतीचे बाळकडू मिळणे अत्यवश्यक आहे. नातवाने आजोबाला धीर देण्याची वेळ येऊन ठपली आहे.


दुर्दैव या मातेचे! असो. माणसाच्या मनात स्फुल्लिंग जन्मतःच असतो. फुंकर घालणारा मिळावा लागतो. हे अल्पस्वल्प पुण्यकर्म करण्याची प्रेरणा घेऊन श्री. भा. म. पराडकर यानीं काही देशाभिमुख बालगीते लिहिली. ती वाचली पर्यायाने हे देशकार्यच! स्तुत्य उपक्रमाबद्दल त्याना धन्यवाद!

१५ ऑगस्ट १९७२
कोल्हापूर.

—जगदीश खेबूडकर

# अनुक्रमणिका


१) चले जाव !
२) स्वातंत्र्य लढयाची सांगता.
३) पायातील दगड.
४) १५ ऑगस्ट १९४७
५) त्रिवार वंदन स्वातंत्र्याला.
६) जय हिंद !
७) आता एकच–
८) राष्ट्रपिता 'गांधीजी'
९) सूर्यास्त
१०) प्रजासत्ताक भारत
११) भारताचे मनोगत.
१२) मानवता
१३) भारत–भाग्यविधाता
१४) गोमंतक स्वातंत्र्याचे स्वागत
१५) तेरेखोलचे हृद्‌गत.
१६) सुकलेला गुलाब
१७) भारताचा लाल
१८) इंदिरा
१९) अशी आमुची सेना.
२०) गाऊं त्यानां मंगलारती.
२१) शूर शिपाई
२२) शत्रूचे थडगे
२३) जय सहकार.
२४) जय जगत्.
२५) गुढी उभारू उंच नभीं.



राष्ट्रपिता ' महात्मा गांधी '

# चले ऽ ऽ जाव !

( आठ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे, गवालिया टँक मैदानावर भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या ऐतिहासिक अधिवेशनांत, महात्मा गांधींनी, इंग्रजी सत्तेला ' चलेजाव ' असा निर्वाणीचा इशारा दिला. त्याच दिवसापासून भारतीय जनता, 'जिकू किंवा मरूं ' या निर्धाराने भारतीय स्वातंत्र्य लढयांत उतरली. गांधीजींच्या त्या दोनच शब्दात केवढे सामर्थ्य होते! )

'चले जाव' चले ऽऽ जाव !
दोनच अवघे शब्द बोलले.
राज्य इंग्रजी हादरले
शब्दांची त्या ठिणगी बनली

ज्वाला क्रांतीची भडकली.
परकीयांची सत्ता गेली
स्वातंत्र्यातें करुन हवाली
इतिहासातिल गौरवशाली

शब्द असे ते प्रभावशाली
चले जाव चलेऽऽ जाव !

# स्वातंत्र्य लढ्याची सांगता

( १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्यासाठी चाललेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सांगता झाली. )

देश आमचा, राष्ट्र आमचे,
आज आम्हां, स्वातंत्र्य मिळाले.
स्वतंत्रतेचे निशाण जगती,
डौलाने ते फडफडले.
ज्याच्यासाठी, लढलो शतके
पणास लावुन सारी शक्ती
आज सांगता, होई त्याची
भारतमातेची हो मुक्ती !

# पायातील दगड

( अनेक ज्ञात व अज्ञात देशभक्त स्वातंत्र्यवीरांच्या प्रयत्नानी भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यांतील अनेकांची नावेही आपणाला माहित नाहीत. त्यांचा त्याग, त्यांचे शौर्य मोठे असूनही, इमारतीच्या पायातील दगडाप्रमाणे ते अप्रसिद्ध च राहिले. )

दिवस आजचा अभिमानाचा,
भारतभूच्या पराक्रमाचा.

देशासाठी कितीक लढले
धारातीर्थी अनेक पडले.

कण, कण, राष्ट्रासाठी झिजले.
त्या सर्वांचे फळ हे आले.

पायातिल ते दगड जाहले
स्वातंत्र्याच्या मंदिरातले !

# १५ ऑगस्ट १९४७

(१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारताच्या अर्वाचीन इतिहासातील 'सुवर्ण-दिन' होय. जगाच्या नकाशात, आजपासून 'भारत' या नावानें, आपला देश एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखला जावूं लागला)

या दिवसाची, अशीच महती.
ध्वज तिरंगी, लहरे वरती.

आज दिवाळी, दसरा आमुचा,
दिवस आजचा, आंनदाचा.

मंगल दिनी या, स्वतंत्र झालो
या भूमीचे, मालक बनलो.

गुलामगिरिचे, सरले जीवन
स्वातंत्र्याने, झालो पावन !

# त्रिवार वंदन

(अनेकांच्या महाप्रयासाने, त्यागाने आणि बलिदानाने मिळालेल्या या भारतीय स्वातंत्र्याला त्रिवार वंदन ! )

देश आज हा, स्वतंत्र झाला,
गुलामगिरिची, तुटे शृंखला.
ध्वज तिरंगी, डोलु लागला.
आत्मा आपुला, पुन्हा गवसला.

स्वतंत्रतेचा, रवी उगवला
शतकानंतर, प्रकाश दिसला.
परदास्याचा, तिमिर लोपला
त्रिवार वंदन, स्वातंत्र्याला!

# जय-हिंद !

( भारतीय स्वातंत्र्याचे एक महान सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यानी परकीय देशांच्या सहाय्याने एका स्वतंत्र भारतीय सेनेची स्थापना केली आणि भारत स्वतंत्र करण्याचा निकराचा प्रयत्न केला. 'जय-हिंद' ही घोषणा नेताजींच्या आझाद हिंद फौजेनेच प्रचलित केली.)

'जय हिंद, जय हिंद' घोष चालला.
जाउन वरती गगनी भिडला.
स्वर्गातिल मग देव बोलले
काय अचानक भूवर घडले ?
बोले नारद, त्या समयाला.
स्वतंत्र झाला, भारत आपुला.
आनंदोत्सव तिथें चालला
निनाद त्याचा इथे उमटला !

# आता एकच-

( भारताला मिळालेल्या या स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करण्याची आता सर्व भारतीयावर जबाबदारी आहे. आता सगळ्यांचा एकच ध्यास असला पाहिजे )

आता एकच, घेऊं आण
रक्षू भारत, देउन, प्राण
आता एकच, आळवू राग.
पेटवू हृदयी, त्याने आग
आता एकच, उधळू रंग
भारतनिष्ठा, ठेऊ अभंग
आता एकच, घेऊ तान
करु या भारतभूस महान.
आता एकच, गाऊ गीत.
शत्रू, ज्याने हो भयभीत !

# राष्ट्रपिता गांधीजी

( आधुनिक भारतीय स्वातंत्र्याचे जनक म्हणून महात्मा गांधीचा उल्लेख केला जातो. आपल्या या देशाचे ‘ राष्ट्रपिता ’ म्हणून सर्व जगात त्याना ओळखले जाते. )

सत्य, अहिंसा आणिक शांती.
त्रिविध आयुधे, घेऊन हाती.
शत्रूवरती मात करीती
स्वातंत्र्याची, करुन निर्मिती
मानवतेची गाती महती.
‘ गांधीजी ’ ही अशी विभूति !

# सूर्यास्त

(भारताला स्वातंत्र्य मिळून, सहा महिने होतात न होतात तोच भारतावर वज्राघात झाला राष्ट्रपिता महात्मा गांधी हे आपल्या दिल्लीतील वास्तव्यात, एका सायंकाळी, प्रार्थनेला येत होते. प्रार्थनास्थळी येताच, एका विरोधी विचारसरणीच्या माथेफिरूने त्यांच्यावर बंदुकीतून गोळ्या झाडल्या आणि भारताच्या या राष्ट्रपित्याची प्राणज्योत मालवली. ३० जानेवारी १९४८ हाच तो काळा दिवस! ;

नित्याच्या समयी न चुकता
येती, प्रार्थना-स्थळी.
उत्सुक तेंथिल जनता, पाहुन
हर्षाने फुलली.
हात जोडुनी नेता हृदयी,
स्पर्श कुणाचा झाला पायी
म्हणुन महात्मा, पाही खाली.
तोंच सूं सूं, गोळी घुमली
मानवतेची, मांगल्याची,
मूर्ति भंगली सायंकाली.
कृष्ण-वर्ण तो मेघ नभीं ये
याची समयाला
काय़, कल्पना होति तयाची
सहस्त्ररश्मीला
कृत्य अघोरी नको पहाया
म्हणूनी जाई तो अस्ताला!

# प्रजासत्ताक भारत

(२६ जानेवारी १९५० या दिवशी भारत हे राष्ट्र 'सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य' म्हणून जाहीर झाले. या दिवसापासून भारतातील प्रत्येक नागरिक या देशाचा मालक बनला.)

कधि शस्त्राने, कधि युक्तीने,
सत्य, अहिंसा, या मार्गानें
अनेक लढले, किती लढाया,
दिवस आजचा हा पहाया.
देशभक्त त्या नरनारींच्या,
त्यागातुन हा दिवस उगवला
स्वप्न कधीचे दृष्टिस पडले
आज 'प्रजेचे राज्य' जाहले !

# भारताचे मनोगत

(प्रजासत्ताक भारताचे धोरण 'जगा आणि जगूं द्या असे आहे. जागतिक शांततेचा तो चहाता! आहे पण त्याचा अर्थ आपुले राष्ट्र दुर्बल आहे असा मात्र नव्हे.)

अढळ, सत्यावरती श्रद्धा,
विरोध आमुचा सदैव युद्धा
धोरण आमुचे तटस्थतेचे,
समता--शांती--समृद्धीचे
खचित नव्हे ती दुर्बलता
असे आमुची सहिष्णुता
कुणी कुठेही करा करार
मुळीं न त्यावर आमुची मदार
परकीयांचा येता घाला
लावूं आम्ही प्राण पणाला.
पटवू अवघ्या या जगताला
इतिहासाचा जुना दाखला !

# मानवता

(जगांतील सर्व राष्ट्रातील जनतेबद्दल भारताला नितांत प्रेम व आदर आहे. मानवाच्या हितासाठी प्रयत्न करणे हेच या देशाचे कार्य आहे)

मानवतेच्या ध्येय-ध्रुवावर,
दृष्टी खिळली असे, निरंतर.

सुख-दुःखाची तमा न करिता
कधीं न देऊ त्यानें अंतर.

सत्य, शांती, समतेसाठी
असे बांधिले हाती कंकण

आणण्यास ती, या भूमीवरती
अटवूं आपुले, रक्त कण कण !

# भारत-भाग्यविधाता

(महात्मा गांधींचे राजकीय वारस, भारताचे पहिलेच पंथप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू. जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी)

आज काश्मिरी गुलाब फुलला
सुवास त्याचा जगी दरवळला

बाल जवाहर, मोठा झाला
गांधीजींचा वारस ठरला

देशाचा या स्वामी झाला
देश तयाने मोठा केला

म्हणुनी बोले, तयास जनता
भारतभूचा 'भाग्यविधाता'!

# गोमांतक स्वातंत्र्याचे स्वागत

(पोर्तुगीज अंमलाखाली असलेल्या गोव्यात १९५४ साली प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू झाली. भारतातून हजारो सत्त्याग्रही रोज गोव्यात जावूं लागले.)

उचल पाऊले, उचल भराभर
गोमांतक तरुणा
हो सामोरा, स्वागत करण्या
स्वतंत्र त्या अरुणा
संभाजी अन् राण्यांचे ते
स्वप्न होई साकार
स्वातंत्र्याचा जिकडे तिकडे
एकच आविष्कार
सात वर्षे सरली आम्हां
मिळवुनी स्वातंत्र्य
सर्वस्वी तू असता आमुचा
अजुनी परतंत्र
घटका भरली, दे झुगारुन
जुलमी ती सत्ता
तिरंगि ध्वज हा घेऊन हातीं
मिळवूं या हाता !

# तेरेखोलचे हृदगत !

(गोवा मुक्ति संग्रामात, तेरेखोल येथील प्रसिद्ध ऐतिहासिक किल्ल्यावर ज्या सत्याग्रहींनीं रक्त सांडले आणि या प्रसंगी ज्यानीं बलिदान केले त्यांचा त्याग व शौर्य पाहून 'तेरेखोलचा किल्ला' असेच म्हणाला नसेल काय? )

कोमल, निर्मल तव रक्तानें
लिहिली अमर कहाणी

स्वातंत्र्याच्या आगमनाची
दुजी कोणती असे निशाणी ?

धारातीर्थी पडले येथे
शिवकालातील कुणी हुतात्मे

प्राणाहुतिनें तुझ्या जाहलें
तुष्ट तयांचे सारे आत्मे

निरपराधी रक्त सांडले
कधीं न जाई वाया

थेंबातुन त्या निघतील ज्वाला
कुणा न येती शमवाया !

# सुकलेला गुलाब

(भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे दिल्ली येथे दि. २७ मे १९६४ रोजी आकस्मिकपणे निधन पावले. त्याना गुलाबाच्या फुलाचे फारच वेड होते. त्यांच्या कोटावर नेहमी एक लहानसा टप्पोरा गुलाब दिमाखाने खोचलेला असे.)

त्रिमूर्तीच्या त्या बागेतिल
फूल गुलाबाचे चिमुकले
एके काळीं रसरसलेले
आज परंतु ते सुकलेले
पंडितजींच्या छातीवरती
डौलानें हो ते मिरविले
आज एकटे झाडावरती
दुःखावेगे ते गहिवरले

# भारताचा लाल

(पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर 'आता कोण' असा फार मोठा प्रश्न भारतीय जनतेच्यापुढे 'आ' वासून उभा राहिला होता. पण त्याची उणीव 'लालबहादूर शास्त्री यानी समर्थपणे भरून काढली. दुर्दैवाने ते लवकरच दिनांक ११ जानेवारी १९६६ रोजी रशियातील 'ताश्कंद' या शहरी एकाएकी निधन पावले.)

**दैव आमुचे हो बलवत्तर**
**नेते आमुचे लालबहादुर**
**दिसावयाला वामन मूर्ति**
**जगति अवघ्या दिगंत कीर्ती**
**मृदु, कुसुमापरि, अंतःकरणीं**
**पोलादापरि, कठिण धोरणीं**
**'भारतभूचा लाल' खरोखर**
**विरजे सिंहासनी घरोघर !**

# इंदिरा

(भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादुर शास्री यांच्या निधनानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी या पंतप्रधान झाल्या. महात्मा गांधी आणि पंडित नेहरू या दोघांच्याही तत्वज्ञानाचा सुरेख संगम म्हणजेच ' इंदिराजी ' होत. गतवर्षीच झालेल्या भारत–पाक युद्धांत त्यानी एक महान मुत्सद्दी म्हणून जगभर लौकिक संपादला.)

लेक लाडकी जवाहराची,
शोभे कन्या, या देशाची
अबला नच ही, प्रबला साची
वदतिल पानें इतिहासाची
स्वतंत्र प्रज्ञा दावुन आपली
कडाडली ही भारत बिजली
राणी लक्ष्मी जणु अवतरली
सौदामिनी ' इंदिरा ' तळपली !



पंतप्रधान ' भारतरत्न इंदिरा गांधी '

# अशी आमुची सेना !

( १९६२ साली आणि १९७१ साली, पाकिस्तानने परकीयांच्या मदतीच्या आधारे, भारतावर जे हल्ले केले त्या प्रसंगी भारताच्या शूर सैनिकानी शत्रूला चांगलीच धूळ चारली. )

सेना आमुची समरधुरंधर,
देशासाठीं सदैव तत्पर
परकीयांच्या मदतीवरती,
पोळ माजले पाकिस्तानी
माणुसकीला लांछन त्यांची,
कृत्ये सगळी ती सैतानी
दिल्ली स्वारीचे सुलतानी
मनांत वसलेले स्वप्न
सैनिक आपुले करिती
पूर्ण तया भग्न
अमेरिकेचे अजस्त्र पॅटन
असता जवळी रणगाडे
टाकुन पळती, पाक पळपुटे
पराभवाचे रणी रडगाणे !

# गाऊं त्यांना मंगलारती

( स्वतंत्र भारतावर परकी राष्ट्रांकडून झालेल्या आक्रमणांत ज्यानीं प्राणपणाने झुंज दिली आणि आपल्या प्राणाचे बलिदान केले त्या शूर सैनिकांच्या स्मृतीस.

साध्य आपुले साधून गेले
पहावयाला परी न उरले
न्यायासाठी रक्त सांडिले
तत्वासाठी, देह अर्पिले
वीर भारत पुत्र शोभती
लढता पडलें धारातीर्थी,
मस्तक ठेऊं चरणावरती
गाऊ त्यांना मंगलारती !



शूर भारतीय सैनिक

# शूर शिपाई

( छत्रपती शिवरायांचे आम्ही वंशज. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे आम्ही वारस–आमच्या स्वातंत्र्याचे आम्ही रक्षक. )

शूर शिपाई या देशाचे,
वंशज आम्ही हो शिवबाचे.
वारस आम्ही टिळक–गांधींचे,
सावरकर अन् नेताजींचे.
रक्षक आम्ही स्वातंत्र्याचे
पाईक आम्ही या देशाचे.

# शत्रूचे थडगे

( आजपर्यंत भारतावर आक्रमण करण्याचा ज्यानी ज्यानीं म्हणून प्रयत्न केला त्या सर्व आक्रमकांची भारतात थडगी बांधण्याचीच पाळी आली. )

बाल, तरुण, प्रौढ, वृद्ध
नरनारी सारे
कोट छातीचा करूनी जावू
शत्रू सामोरे
धर्म, जाति, पक्ष, भेद
विसरुनी सारे एकवटू
हिमालयाच्या पलीकडे
अन् शत्रूला रेटू
राज्य कराया भारत देशी
जे जे परकी आले
भारतियानी थडगें त्यांचें
इथेच बांधियले !

# जय सहकार !

(स्वतंत्र भारतात 'सहकाराला' फारच महत्व प्राप्त झाले आहे. सर्व कामे सहकार्याने करण्यातच देशाची प्रगती आहे)

जय सहकार, जय सहकार
सहकाराचा जयजयकार
सहकाराने हो उद्धार
प्रगतीचा तो आधार
एक एकला, मागे पडला
मानव आता जागा झाला
एकवटूनी सामर्थ्याला
लागे नवीन उद्योगाला
करुनी भूमी, सुजला सुफला
भूगोल त्याने अन् पालटला !

# जय जगत्

( महात्मा गांधीचे आध्यात्मिक वारस आणि सर्वोदय चळवळीचे व भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांची ही घोषणा.)

REFBK-0022515
REFBK-0022515

या धरतीची, आम्हीं लेकरे
एकच आमुची, जातकुळी रे
मानवता, हा धर्म आमुचा
मंत्र आजचा, हाच युगाचा
विसरुन, घडले पूर्वी, सारे
नव्या युगाचा, नवा मंत्र रे
ध्यास धरू या, या मंत्राचा
घोष करू या, 'जय जगत्' चा.

# गुढी उभारू उंच नभीं

( भारतरत्न इंदिरा गांधीच्या प्रभावी नेतृत्वाखाली भारतात समाजवादी लोकशाही रुजवण्याचे जोरदार प्रयत्न चालू झाले आहेत. त्याला आपण सर्वांनी सतत साथ दिली पाहिजे. )

भारत देशी, नव्या युगाच्या
शुभद अशा या प्रारंभी
समाजवादी, लोकशाहिची
गुढी उभारू उंच नभीं
जातियवादी, प्रतिगामी अन्
दहशतवादी लक्तरे
टाकायाला जाळुन सारी
या युवकानों या सामोरे
महन्मंगल मानवतेच
मिळुनी सारे वस्त्र विणू
नव वर्षाच्या, प्रारंभी तें,
उंच गुढीवर, या, चढवूं !

# आभार

हा संग्रह प्रसिद्ध करणारे माझे स्नेही व एक स्वातंत्र्य–सैनिक श्री शामराव विठ्ठल मेवेकरी याना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

या छोटयाशा संग्रहाचा साजेसा पुरस्कार केल्याबद्दल मराठी–तील सुप्रसिद्ध कवी डॉ.–प्रा. सूर्यकांत खांडेकर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे लाडके चित्रपट गीत लेखक व कवी श्री. जगदीश खेबूडकर यानीही या उपक्रमाचे कौतुक केल्याबद्धल, त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

तसेच ठरल्या वेळेत उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल शारदा छापखान्याचे चालक श्री. पांडुरंगराव वरूटे व माझ्या कल्पनेप्रमाणे मूखपृष्ठावरील सजावट करून देणारे चित्रकार श्री मन्सूर यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे यातील काही कवितानां वेळोवेळी प्रसिद्धी दिलेल्य स्थानिक वृत्तपत्रांचे व साप्ताहिकांचेही मी आभार मानतो.

१५ ऑगस्ट १९७२
कोल्हापूर.

कवि
–भा. म. [illegible]

[illegible]त्' चा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2358
दा. क्र. 22595 का१९५
ग्रंथ शाखा

# आभार

हा संग्रह प्रसिद्ध करणारे माझे स्नेही व एक स्वातंत्र्य-सैनिक श्री शामराव विठ्ठल मेवेकरी याना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

या छोटयाशा संग्रहाचा साजेसा पुरस्कार केल्याबद्दल मराठी-तील सुप्रसिद्ध कवी डॉ.-प्रा. सूर्यकांत खांडेकर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे लाडके चित्रपट गीत लेखक व कवी श्री. जगदीश खेबूडकर यानीही या उपक्रमाचे कौतुक केल्याबद्धल, त्यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

तसेच ठरल्या वेळेत उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल शारदा छापखान्याचे चालक श्री. पांडुरंगराव वरूटे व माझ्या कल्पनेप्रमाणे मूखपृष्ठावरील सजावट करून देणारे चित्रकार श्री मन्सूर यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे यातील काही कवितानां वेळोवेळी प्रसिद्धी दिलेल्य स्थानिक वृत्तपत्रांचे व साप्ताहिकांचेही मी आभार मानतो.

१५ ऑगस्ट १९७२
कोल्हापूर.

कवि
-भा. म. [illegible]

[illegible]' चा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2358 / 22415
शाखा

फोन नं. २२३

## मेसर्स मोरो गणेश करमरकर

सराफी दुकान, भाऊसिंगजी रोड,
जुन्या राजवाड्याजवळ, कोल्हापूर.

सर्व तऱ्हेच्या सोन्या चांदीचा माल ऑर्डरीप्रमाणें तयार करून मिळेल.

कोल्हापुरांतील सर्वांत जुने दुकान

केशरी पेढे, मंगल-कार्यासाठी साखर-पुड्यासाठी प्रसिद्ध दुकान

## शामराव विठ्ठल मेवेकरी

महालक्ष्मी देवालय, पूर्व दरवाजा
कोल्हापूर,

एकवार अवश्य भेट द्या